Page :
Date : / /

# नवी पालवी



पानगळीने निष्पर्ण झालेला होता एक वृक्ष ।
सुख दुःखाच्या ऋतुचक्राची देत होता साक्ष ॥
याच काष्ठवत झाडाने खिडकीतून डोकावून पाहिले ।
त्याच्यासारखेच होते कुणीतरी व्यथीत अन् खंतावलेले ॥
मात्र चेहऱ्यावर त्याच्या शांत शांत भाव होता ।
आयुष्याच्या संध्याछायेचा तो प्रभाव होता ॥
मूक सुरकुत्यांवर लिहिलेला जीवनाचा गूढ प्रवास ।
कष्टमय आयुष्याचा होता प्रत्यक्ष इतिहास ॥
शेजारी बसलेली पत्नी असहाय्य, व्याकूळ दिसत होती ।
हात हाती घेऊन त्याचा, स्वतःलाच दिलासा देत होती ॥
गालावरील अश्रुंना वारा सुकवित होता ।
दुःख आवेगाला महत्प्रयासाने थोपवित होता ॥
तिची नजर मात्र सारखी बाहेर भिरभिरत होती ।
वाटेकडे डोळे लावून, सारखी वाट बघत होती ॥
उघडझाप करणारे डोळे व हलणारी पापणी ।
जीवंतपणाची होती तेवढीच एक निशाणी ॥
तेवढ्यात... वेगात, धडपडत कुणी तरी आत आले ।
काळजाचा तुकडा त्यांचा, समोर येऊन उभा राहिला ॥
"चुकलो, बाबा चुकलो, मला मोठ्या मनाने माफ करा ।
चुकलेल्या पाखराला तुमच्या, पुन्हा पंखाखाली घ्या ॥
पश्चातापाने हृदयाची त्याच्या काहिली काहिली झाली ।
माय बापाची पाऊले त्याने आसवांनी भिजविली ॥
त्या शांत डोळ्यात आता स्मित हास्य दिसत होते ।
मूक सुरकुत्यांवर आता गुलाब फुललेले होते ॥
बाहेरच्या त्या वृक्षाला ही आता इवली इवली पालवी फुटली होती ।
फांदी फांदीवर आता चिमण्यांनी दाटी केली होती ॥
दूर देशीचे पाखरू पुन्हा घरट्यात परतले होते ।
तृप्तीचे, समाधानाचे चित्र साकार झाले होते ॥

सौ. शोभा पांडे